**सत्यमेव जयते**

**महाराष्ट्र शासन**

**अधीक्षक अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे मंडळ,**

**कोल्हापूर यांचे कार्यालय,**

**सिंचन भवन, ताराबाई पार्क, कोल्हापूर**

**ई-मेल :- klpsekickop@gmail.com दूरध्वनी क्र. (०२३१) २६५१२६०, २६५३१८२**

# सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामांसाठी घेणे बाबत

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि. १७.१२.२०१६ अनुसार खालील संवर्गातील फक्त जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करार पध्दतीने या मंडळांतर्गत कार्यरत असलेल्या विभागांतर्गत कोल्हापूर / सांगली जिल्हयांतर्गत **क्षेत्रियस्तरावरील सिंचन व्यवस्थापन व बांधकामाधीन प्रकल्पांची कामे पुर्ण करण्यासाठी** एक वर्षासाठी करावयाची आहे. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांची सेवा अधीक्षक अभियंता कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, कोल्हापूर यांचे अधिनस्थ कामांसाठी राहील. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांना सिंचन व्यवस्थापन व प्रकल्प बांधकाम या प्रकारचे सखोल ज्ञान व पुरेसा अनुभव असणे आवश्यक आहे. इच्छुक अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्ज **कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग क्र.2, सिंचन भवन परिसर, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६००३** यांच्याकडे दिनांक ०६/०७/२०२० ते दिनांक १५/०७/२०२० (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) प्राप्त होतील याप्रमाणे पोष्टाव्दारे सादर करावेत किंवा कार्यालयामध्ये प्रत्यक्ष द्यावेत. अर्जाचे पाकीटावर " सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची करार पध्दतीने कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर नेमणूक करण्याबाबत" असे स्पष्ट लिहिण्यात यावे. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. सदर नेमणूका/ नियुक्ती समिती मार्फत मुलाखती व्दारे करण्यात येतील व सदर नेमणूकीचे आदेश हे सक्षम स्तरावरील अंतिम मान्यतेनंतरच निर्गमित करणेत येतील.

**करार पध्दतीने भरावयाच्या पदांचा तपशील खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचा तपशील | जलसंपदा विभागातुन खालील पदावरुन सेवानिवृत्त |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (पदाची संख्या 8) | क्षेत्रिय स्तरावरील सिंचन व्यवस्थापन/ बांधकामाधीन पाटबंधारे प्रकल्पांची कामे | सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता / सहा.अभि.श्रेणी.२ / शाखा अभियंता / उपविभागीय अभियंता / अधिकारी (स्थापत्य) |

सदर नेमणूकीकरीता लागू असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना हा कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग क्रं.2, कोल्हापूर या कार्यालयात उपकार्यकारी अभियंता यांचेकडे तसेच शासनाच्या जलसंपदा विभागाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव व पत्ता | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग क्र.2, सिंचन भवन परिसर, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६००३ | (०२३१) -२६५०५०२ |

**सही/-**
**अधीक्षक अभियंता,**
**कोल्हापूर पाटबंधारे मंडळ,**
**कोल्हापूर.**

❈ **सदर नेमणुका हया खालील सर्वसाधारण शर्ती व अटींच्या अधिन राहतील.**

१.करारपध्दतीने नेमणुकीकरीता अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे वय दिनांक एक जून २०२० रोजी ६३ वर्षापेक्षा अधिक नसावे.

२.अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-याना करार पध्दतीने करावयाच्या कनिष्ठ अभियंता या सवंर्गातील पदाचे विवक्षित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३.अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी शारीरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

४.अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-याविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नसावे याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातुन सेवानिवृत्त झालेले आहेत, त्या संबंधीत कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र घेऊन अर्जासोबत सादर करावे .

५.करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ तसेच इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्याचा अधिकार नसेल हे स्विकृत असले बाबत अर्जदाराने रु. १००/- च्या स्टॅम्पवर अर्जासोबत बंधपत्र/हमी पत्र देणे अनिवार्य आहे.

६. नियुक्त अर्जदाराला त्यांनी विहित कार्यपालन केल्यामुळे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/१३ दि. १७/१२/२०१६ मधील अटी व शर्तीप्रमाणे त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) उच्चतम मर्यादित रू.४०,०००/- (रूपये चाळीस हजार)किंवा प्रस्तुत शासन निर्णयातील परिगणना तक्त्याप्रमाणे (६ व्या वेतन आयोगातील वेतनावर आधारीत येणारे वेतन हे मासिक पारिश्रमिक म्हणूनअनुज्ञेय राहील.

७.करार पध्दतीने नियुक्त झालेल्या उमेदवाराचे घोषित कार्यक्षेत्र हेच मुख्यालय राहील. तथापि आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्ती वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

८.नियुक्ती प्राधिकारी (अधीक्षक अभियंता) यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

९.करार पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेल्या व्यक्तीने त्याच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेले कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील, त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

१०.करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमुन दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

११.क्षेत्रिय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही नैसर्गिक अपघात व काही आजार उदभवल्यास कार्यालय/शासन बांधील राहणार नाही.

१२. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या उमेदवार/ अभियंत्यास नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल.

१३.अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे निवृत्तीवेतन मंजूरीचे महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्तऐवज सादर करावेत/निवृत्तीचे कागदपत्र सादर करावेत.

१४. माहे जुलै २०२० अखेर सेवानिवृत्त होणारे कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-२/उपविभागीय अभियंता /उपविभागीय अधिकारी अर्ज करु शकतात तथापि त्यांचा अर्ज सेवानिवृत्तीनंतर विचारात घेण्यात येईल.

१५.करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासुन १५ दिवसांचे आत रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१६.सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त १ (एक ) वर्षासाठी देण्यात येईल. सदर नेमणूक १ वर्षाच्या पुढे वाढविण्याची आवश्यकता भासल्यास नियुक्ती अधिकारी तसा निर्णय घेऊ शकतात.

१७.करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती वर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी. तसेच त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/ माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

१८.करार पध्दतीने नियुक्त करणेत आलेल्या व्यक्तीनां कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करणेत येणार नाहीत.

१९.मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांना पत्र ई-मेलव्दारे पाठविण्यात येईल व भ्रमणध्वनीवर लघु संदेशाव्दारे कळविण्यात येईल. यास्तव अर्जदारांनी आपल्या वैयक्तिक माहीतीत त्यांचा ई-मेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी अधीक्षक अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, कोल्हापूर व कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग क्रं २ कोल्हापूर यांचे सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल. अंतिम निवड झालेल्या अर्जदारांची यादी वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल, तसेच अंतिम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तिक ई-मेल वर कळविण्यात येईल.

उपरोक्त १ ते १८ अटी व शर्ती मला मान्य आहेत हयाबाबतचे रु. १००/- च्या स्टॅम्पपेपरवर बंधपत्र अर्जासोबत देणे अर्जदारास बंधनकारक राहील.

सदर नियुक्ती मंडळांतर्गत प्रकल्पावरील सिंचन व्यवस्थापन / प्रकल्पांचे बांधकाम कामासाठी करण्यात येत असून त्यासाठी योग्य उमेदवार न मिळाल्यास कांही अथवा सर्व पदे न भरण्याचा अधिकार समितीने राखून ठेवला आहे.

**सही/-**
**अधीक्षक अभियंता,**
**कोल्हापूर पाटबंधारे मंडळ,**
**कोल्हापूर.**

## विहित नमुन्यातील अर्ज
## पायाभुत सुविधा निर्मिती एमपॅनलमेंट

कनिष्ठ अभियंता संवर्ग (करार) या पदासाठी जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा विविध कामाकरीता करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबतचा अर्ज

प्रति,

मा. अधीक्षक अभियंता,
कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, कोल्हापूर,
सिंचन भवन, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६००३.

| उमदेवाराचे अलिकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |
|---|

अर्ज केलेल्या पदाचे नाव :- ----------------------------------------

१. अर्जदाराचे नाव :-
२. कायमचा पत्ता :-
३. दूरध्वनी क्रमांक :-
भ्रमणध्वनीसह (अनिवार्य) :-
४. ई-मेल (अनिवार्य) :-
५. सध्याचा पत्ता :-
६. जन्मतारिख :-
७. राष्ट्रीयत्व :-
८. प्रवर्ग :-
९. लिंग (पुरुष/महिला) :-
१०. अवगत भाषा :-
११. शैक्षणिक माहिती :-

| अ.क्र. | परिक्षा | वर्ष | विषय | शाळा/कॉलेजचे नाव | बोर्ड/विद्यापीठ |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |

१२. इतर शैक्षणिक माहिती (संगणक इत्यादी) —

| अ.क्र. | अभ्यासक्रम | वर्ष | संस्थेचे (प्रायोजक) नांव |
|---|---|---|---|
| १ | | | |

१३. अनुभव -

| अ.क्र | हुद्दा व वेतन | कार्यालयाचे नाव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |

१४ सेवानिवृत्तीचा दिनांक -
१५. कोणत्या जिल्हयात काम करण्यास इच्छुक आहे त्या जिल्हयाचे नाव -
१६. सद्य:स्थितीत कुठे काम करीत असल्यास तपशील -

मला पुर्णपणे माहिती आहे की, पायाभुत सुविधा निर्मिती एमपॅनलमेंट व्दारे प्रकल्पाचे क्षेत्रिय कामाकरिता सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी कनिष्ठ अभियंता या पदाकरीता उमेदवारांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पदे प्रकल्पाचे कामासाठी १ वर्षाकरीता आहेत व कामाचे व्याप्ती प्रमाणे कमी/अधिक करणेत येतील. कामाच्या निकडीनुसार कोल्हापूर/सांगली जिल्हयातील कोणत्याही तालुक्यात माझी काम करण्याची तयारी आहे.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझे माहिती प्रमाणे वर दिलेला तपशील सत्य व अचूक आहे. यामध्ये काही चूकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पूर्व सुचने शिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :- अर्जदाराची सही :-

दिनांक :- नाव :-

सहपत्र :-

**कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग क्र.२, कोल्हापूर**

सिंचन भवन ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६ ००३

e-mail : eempd२_kolapr@wrd.maharashtra.gov.in

☎ ०२३१-२६५०५०२

जा.क्र.मप्रवि-२/पशा/आ-१/ १६२१ /२०२० दिनांकः-०१ / ०७ /२०२०

**प्रति**,
मा.अधीक्षक अभियंता,
जलसंपदा ई प्रशासन मंडळ,
जलसंपत्ती भवन,
कोथरुड , पुणे – ४११०३८.

**विषय**:- सेवानिवृत्त अधिकारी /कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)सवंर्गात घेणे बाबत.

**संदर्भ** १) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण - २७१५/प्र.क्र.१००/१३दिनांक १७/१२/२०१६.
२)मंडळ कार्यालयाचे पत्र क्र. /जा.क्र/कोपामं/पशा४/२३८६/दि ०८/०६/२०२०

उपरोक्त विषयांकींत प्रकरणी सादर करणेत येते की, सेवानिवृत्त अधिकारी /कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदावर नियुक्तीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज व जाहीरात प्रसिध्द करणे साठी या कार्यालयास संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये अधीक्षक अभियंता,कोल्हापूर पाटबंधारे मंडळ,कोंल्हापूर यांनी प्राधिकृत केले आहे. त्यास अनुसरुन संदर्भिय पत्र क्रं १ च्या शासन निर्णयातील तरतुदी नुसार करार पध्दतीने कनिष्ठ अभियंता(स्थापत्य) पदावर नियुक्तीसाठीची जाहीरात व त्यातील शर्ती व अटी तसेच विहीत नमुन्यातील अर्ज सोबत सादर करणेत येत आहे. सदरची जाहीरात शासनाच्या जलसंपदा विभागाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावी ही विनंती .

हे आपले माहितीसाठी व सत्वर कार्यवाहीसाठी सविनय सादर.

सोबत –वरीलप्रमाणे

उपकार्यकारी अभियंता,
मध्यम प्रकल्प विभाग क्र.२,
कोल्हापूर.

स्थळ प्रत का.अ.यांना मान्य.

प्रत :- मा.अधीक्षक अभियंता,कोल्हापूर पाटबंधारे मंडळ,कोल्हापूर यांना माहितीकरीता सविनय सादर.
सोबत –वरीलप्रमाणे